अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## नंदेश्वर येथे दहावीच्या पेपरला२० तोतया परीक्षार्थी सापडले

मंगळवेढा/प्रतिनिधी

मंगळवेढा तालुक्यातील एका परीक्षा केंद्रावर तोतया परीक्षार्थींनी पेपर देत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर केंद्र संचालकाने झाडाझडती घेतल्यानंतर सुमारे २० तोतया परीक्षार्थी सापडले.

याप्रकरणी विठ्ठल निवृत्ती एकमल्ले याने मंगळवेढा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून २० जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. या २० पैकी तोतया परीक्षार्थी यांचा पत्ता आढळून आलेला नाही. तर उर्वरित १० आरोपी कोल्हापूर, सांगली, सांगोला, अथणी, येथील असल्याचे पोलिसांनी सांगितले.

मंगळवेढा तालुक्यातील बाळकृष्ण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नंदेश्वर या ठिकाणी हे सर्वजण दुसऱ्याच विद्यार्थ्यांच्या नावाने परीक्षा देत होते. बनावट हॉल तिकिट व बनावट आयडेंटी कार्ड तयार करुन या २० जणांनी परीक्षा देण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी विठ्ठल एकमल्ले यांनी त्यांच्याकडील आयडेंटी कार्डाची पडताळणी केल्यानंतर ते सर्वजण तोतया परीक्षार्थी असल्याचे उघड झाले. याप्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे हे करत आहेत.

www.surajyadigital.com । शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १४४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

# स्वीकृत सदस्य निवडीवरून महापालिकेत रणकंदन

## विरोधकांची डायसवर धडक देत घोषणाबाजी

## प्रचंड गोंधळानंतर महापौरांकडून पहिलीच सभा तहकूब

सोलापूर/प्रतिनिधी

**महापालिकेत बहुचर्चित ९ स्वीकृत सदस्यांऐवजी भाजपाने ८ तर नगरसचिवांनी सात नावे जाहीर केल्यानंतर शिवसेना नगरसेवक अमोल शिंदे आणि काँग्रेसचे चेतन नरोटे यांनी भाजपवर टीका करत आक्रमक भूमिका घेतली. नवा पायंडा पाडू नका, बेकायदेशीर काम करू नका, असे म्हणत त्याला कडाडून विरोध केला. यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली. या गोंधळातच दुखवाट्याचा प्रस्ताव मांडत महापौर विनायक कोंड्याल यांनी अखेर सभा तहकूब केली. त्याचाही विरोधकांनी तीव्र शब्दात निषेध नोंदवला. विरोधकांनी थेट महापौरांच्या डायसवर जाऊन धिक्काराच्या घोषणाबाजी केल्या. त्यामुळे सभागृहात काहीवेळ वातावरण तंग बनले होते.**



सोलापूर : स्वीकृत नगरसेवक निवडीवरुन शुक्रवारी महापालिकेत गोंधळ झाला. विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी डायसपुढे येऊन जोरदार घोषणाबाजी केली.

महापौर निवडीनंतरची सोलापूर महापालिकेची पहिलीच सर्वसाधारण सभा शुक्रवारी सकाळी ११ वाजता महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. ११:२५ मिनिटांनी सभेस सुरुवात झाली. सुरुवातीलाच स्व.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहून कामकाज सुरू करूया अशी सूचना सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी मांडली. त्यानंतर काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे यांनी विषय पत्रिकेनुसार आधी निवडी होऊ द्या, अशी सूचना केली. त्यानंतर ११. २८ वाजता सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी विषय क्रमांक दोन, चार, पाच, सहा, सात आणि तीन प्राधान्याने विषय प्राधान्य क्रमानुसार सभापटलावर मांडले. त्यावर अमोल शिंदे यांनी विषय क्रमांक तीन शेवट का असा सवाल उपस्थित करत तुमच्या वाटाघाटी झाल्या नाहीत का ? असा आरोप केला

त्यावर नरेंद्र काळे यांनी तो महापौरांचा अधिकार आहे, असे स्पष्ट केले. त्यानंतर विषय क्रमांक दोन नुसार स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नावे जाहीर करण्याच्या प्रस्ताव अंतर्गत सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी भाजपच्या १४ स्थायी सदस्यांची नावे जाहीर केली. एमआयएमच्या गटनेत्या वहिदा शेख यांनी तर शिंदे सेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी प्रत्येकी एक - एक सदस्यांची घोषणा केली. एक मताने हा विषय महापौरांनी मंजूर केला. त्यानंतर स्वीकृत सदस्यत्व संदर्भात विषय क्रमांक चार सभापटलावर आला. त्यानंतरच खरी गोंधळाला सुरूवात झाली.

सुरुवातीलाच सभागृह नेते काळे यांनी भाजपच्या नऊपैकी आठ स्वीकृत सदस्यांची नावे वाचून दाखविली. त्यानंतर एमआयएमच्या गटनेत्या वहिदा शेख यांनी नईम सालार यांच्या नावाची घोषणा केली. एकमताने या विषयास मान्यता देण्यात आली. दरम्यान, विरोधी पक्षाचे अमोल शिंदे आणि चेतन नरोटे यांनी भाजपा सभागृह नेत्यांनी ९ ऐवजी ८ सदस्यांच्या नावाची यादी वाचली आहे. नगरसचिवांनी पुन्हा ती यादी वाचून दाखवावी अशी मागणी केली. त्यावर नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी

(अधिक वृत्त पान ७ वर)

### सत्ताधारी भाजप चक्रव्युहात अडकली

विरोधी पक्षाचे अमोल शिंदे आणि चेतन नरोटे त्याचबरोबर एमआयएमच्या नगरसेवकांनीही सत्ताधाऱ्यांना धारेवर धरत अडचणीत आणले. सत्ताधारी भाजप जणू सभागृहात चक्रव्युहात अडकल्याची स्थिती पाहायला मिळाली. नूतन स्वीकृत सदस्य आणि भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर या महापौरांच्या मदतीला सरसावल्या. दुखवटा प्रस्ताव मांडून सभा तहकूब करण्याची सूचना केली. त्यानंतर महापौर कोंड्याल यांनी स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहून दुःखवटा प्रस्तावासह ही सभा तहकूब केली.

### माझी उमेदवारी ऐनवेळी डावलली : किसन घोडके



महापालिका स्वीकृत नगरसेवक पदासाठी माझे नाव भाजपकडून निश्चित करण्यात आले होते पण स्थानिक पक्षांतर्गत राजकारणामुळे ऐनवेळी मला डावलण्यात आले, असा आरोप भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते किसन घोडके यांनी केला. आजपर्यंत आपण पक्षाचे एकनिष्ठपणे काम करत आलो आहोत. महापालिका निवडणुकीसाठी मी अनेकदा उमेदवारी मागितली, पण मला ती देण्यात आली नाही. आता स्वीकृत सदस्य पदी मला संधी देण्यात येत होती, पण अंतर्गत राजकारणामुळे मला डावलण्यात आले आहे, असे घोडके म्हणाले.

### अमोल शिंदेंनी उडवून दिली खळबळ

स्वीकृत नगरसेवकपदासाठी इच्छुक असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या एका इच्छुकाने मला मेसेज केला आहे. त्याने बालाजी सरोवर येथे असलेल्या काही नेत्यांची, काही आमदाराचे नाव लिहून आत्महत्या करण्याची धमकी दिली आहे, अशी धक्कादायक माहिती शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी सभागृहात दिली, त्यामुळे पहिल्याच सभेत मोठी खळबळ उडवून दिली.

### निवडीविरोधात आम्ही कोर्टात जाणार : नरोटे

सोलापूरच्या जनतेने भाजपला मोठे बहुमत दिलं. पण त्यांना सभागृह चालवता येत नाही, सभागृह नेत्याने स्वीकृत नगरसेवकांची सातच नावे जाहीर केली आहेत. त्याविरोधात आम्ही कोर्टात जाऊन या निवडीवर स्टे आणणार आहोत, असा इशारा काँग्रेसचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक चेतन नरोटे यांनी दिला.

## आघाडीने खुंटी हलवली, भाजपची नशा उतरवली

## मनमानी भोवली

ठाणे/प्रतिनिधी

राज्यात महायुतीच्या सत्तेत रिमोट कंट्रोल असलेल्या भारतीय जनता पक्षाची मनमानी वाढत चालली आहे. नगरपरिषदा, महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत ही एकाधिकारशाही पहायला मिळाली. विरोधी पक्ष फोडून स्वतः ची खुंटी मजबूत करण्याचे उद्योग भाजप नेत्यांचे बळावले होते मात्र भिवंडी महानगरपालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपला मोठा दणका बसला. काँग्रेसप्रणित आघाडीने भाजपची ही खुंटी खिळखिळी करून टाकली आणि भाजप नेत्यांची नशा उतरवून टाकली. ज्यांनी आपापर्यंत काँग्रेसचे घर फोडले,त्याच भाजपच्या घराला खिंडार पाडून आघाडीने महापौरपद अखेर खेचून घेतले

भाजपमध्ये निवडणुकीपूर्वी मोठी फूट पडल्याने भिवंडीतील राजकारण ३६० डिग्रीमध्ये फिरले. या ठिकाणी मोठी उलथापालथ झाली आणि भाजपचा बंडखोर नगरसेवक काँग्रेसच्या पाठींब्यावर महापौरपदी विराजमान झाला. निवडणुकीपूर्वी दोन दिवस अगोदर महापौरपदाचा उमेदवार भाजपने बदलण्याचा केलेला प्रयोग त्यांच्या अंगलट आला आहे. उमेदवारी ऐनवेळी कापल्याने भाजपचे नगरसेवक नारायण चौधरी यांनी बंड करीत काँग्रेसच्या मदतीने महापौर झाले आहेत. दुसरीकडे भाजपचे नगरसेवक सुहास नकाते यांना उपमहापौरपदाची उमेदवारी दिलेली असतानाही त्यांनीही बंड करीत भाजप विरोधात एल्गार पुकारला.

भिवंडी महापालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीआधीच राजकीय दृष्ट्या मोठी उलथापालथ होणार हे स्पष्ट झाले होते. भाजपने महापौर पदाचा ऐनवेळी उमेदवार बदलल्याने या निवडणुकीत मोठा ट्विस्ट आला होता. भाजपने नारायण चौधरी यांच्याऐवजी स्नेहा मेहुल पाटील यांना संधी देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे नाराज झालेल्या नारायण चौधरींच्या गटाच्या नऊ नगरसेवकांनी काँग्रेस आघाडीला पाठिंबा दिला होता. त्यामुळे महापौर निवडणुकीत ट्विस्ट पाहवयास मिळाला.

(अधिक वृत्त पान ७ वर)

### आयारामांनीच दिला धडा...

राज्यातील तीनही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप नेत्यांनी निष्ठावंतांना डिवचले आणि आयारामांना खांद्यावर घेतले. अनेक ठिकाणी निष्ठावंतांना डावलून बाहेरून आलेल्यांना तिकिटे दिली. पदाधिकारी निवडीतही हेच प्रकार घडले.भिवंडीत मात्र अजब प्रकार घडला.भाजपने बाहेरून आलेल्यांना नगरसेवक म्हणून निवडून आणले, त्याच लोकांनी दगा दिला.दंड थोपटून हे लोक पुन्हा काँग्रेसच्या आश्रयाला गेले.



ICC MEN'S T20 WORLD CUP

आजचा सामना

न्यूझीलंड v/s पाकिस्तान

स्थळ : कोलंबो

वेळ : सायंकाळी ७ वाजता

बीडचे जिल्हा प्रशासन हादरले : परळीत एसीबीचा मोठा दणका !

## तहसीलदार मुंडे लाचखोरीच्या जाळ्यात

बीड/प्रतिनिधी

महायुतीच्या सरकारमधील अन्न-औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील एक लिपिक लाच घेताना सापडला. त्यानंतर मुंबईतील दोन पोलीस अधिकारी तीन लाखांची लाच घेतला सापडले. या दोनही घटना ताज्या असतानाच बीडमधल्या परळीतून एक मोठा आणि धक्कादायक प्रकार घडला आहे. ही घडामोड परळीच्या तहसीलदारांसंबधी आहे. यामध्ये भ्रष्टाचाराचा मोठा मासा गळाला लागला आहे. बीड जिल्ह्याच्या परळी येथील तहसीलदार व्यंकटेश मुंडे हे लाच प्रकरणात अडकल्याची घटना उघडकीस आली. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. तहसीलदार मुंडे यांना घेऊन एलसीबीचे पथक बीडकडे रवाना झाले असून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.



व्यंकटेश मुंडे

दरम्यान, आतापर्यंत मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार या प्रकरणात तक्रारदाराकडून तळेगावकर यांच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र देण्यासाठी ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याची तक्रार बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे काही दिवसापूर्वी करण्यात आली होती. या तक्रारीनंतर एसीबीने सापळा रचून कारवाई केली असल्याचे सांगण्यात आले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली असून तक्रारदाराकडून सुरुवातीला ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

### सापळा रचून कारवाई

एसीबीकडे तक्रार दाखल झाल्यानंतर पथकाने पडताळणी करून सापळा रचला. दरम्यान, तक्रारदाराच्या हालचालींवर संशय आल्याने तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केल्याचे सांगण्यात येत आहे. तरीही एसीबीने आवश्यक पुरावे संकलित करत पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली असल्याचेही सांगण्यात आले.

### गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु

या घटनेमुळे परळी तालुक्यातील महसूल प्रशासनात एकच खळबळ उडाली असून जिल्ह्यातही या कारवाईची जोरदार चर्चा सुरू आहे. संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास केला जात आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता वर्ल्ड बँकेला यावे लागले !

कल्याण 678-18-350

मुंबई 139-39-117

## दुःखावर मात करत तिने सोडवला मराठीचा पेपर

### दहावीतील धनश्रीच्या धाडसाची शिक्षण क्षेत्रातून प्रशंसा

सोलापूर/प्रतिनिधी

माणूस लहान असो की मोठा...त्याच्या आयुष्यात दुःख सुटलेले नाही. असे दुःख आल्यानंतर त्यावर मात करण्याची हिम्मत दाखवावी लागते. असाच प्रसंग सोलापुरात घडला आहे. दहावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीवर परिक्षेचा दिवस असताना तिच्यावर एकाएकी दुःख कोसळले. ती खंबीर झाली आणि शुक्रवारी तिने दहावीचा पेपर सोडवला. तिच्या या धाडसाची शिक्षण क्षेत्रातून प्रशंसा केली जात आहे. धनश्री भिकाजी पवार असे त्या विद्यार्थिनीचे नाव आहे.



धनश्री पवार

झाले असे की, धनश्री ही शरदचंद्र पवार प्रशालेत दहावीत शिकत होती. तिचा शुक्रवारी मराठीचा पहिला पेपर होता. सकाळी दहा वाजता सोलापुरातील भू. म. पुल्ली कन्या प्रशाला केंद्रावर ती जाणार होती. परीक्षेला निघण्याच्या तयारीत असताना रुग्णालयात डायलिसेसचे उपचार घेत असलेले तिचे वडील भिकाजी पवार यांचे निधन झाले. हे ऐकून ती खचून गेली. अशा दुःखद प्रसंगात परीक्षा देण्याची तिची मानसिकता नव्हती. ही बातमी शाळेतही पोहचली. तेव्हा प्रशालेचे



भिकाजी पवार

मुख्याध्यापक तानाजी माने यांनी तिचे वर्ष वाया जाऊ नये यासाठी तिला धीर देत त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधला आणि मतपरिवर्तन करून परीक्षा देण्यास प्रवृत्त केले.

तिला घरातून परीक्षा केंद्रावर पोहोचविले. हा धीर प्राप्त होताच तिने दुःख बाजूला ठेवत पहिला मराठीचा पेपर दिला. परीक्षा देवून झाल्यानंतर ती घरी गेली आणि वडिलांचे अंतिम दर्शन घेतले.त्यानंतर तिच्या वडिलांवर अंत्यासंस्कार करण्यात आले.

### केंद्रप्रमुख अन् मुख्याध्यापकांची तळमळ

दहावीची परीक्षा आयुष्याची दिशा ठरविणारी असते. त्यासाठी धनश्री सज्ज होत होती. भू. म. पुल्ली कन्या प्रशाला केंद्रावर तिच्या स्वप्नांची पहिली पायरी उभी होती. पण नियतीने तिच्यावर संकटाचीच परीक्षा लादली. तिच्या वडिलांचे निधन झाले हे कळताच शरदचंद्र पवार प्रशालेचे मुख्याध्यापक व राज्य मुख्याध्यापक संघ महामंडळाचे अध्यक्ष तानाजी माने तिच्या घरी गेले. घरातून तिला गाडीवर बसवून तिला परीक्षा केंद्रात आणले. तिला पेपर सोडविण्यासाठी केंद्रप्रमुख गीता सादूल यांनी धीर दिला.

### शिक्षणधिकाऱ्यांची सतर्कता...

धनश्रीच्या घटनेबाबत माध्यामिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांना कळताच ते भू. म. पुल्ली कन्या प्रशालेच्या परीक्षा केंद्रावर तत्काळ हजर झाले. त्यांनी मुलींची विचारपूस करीत तिला परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहन दिले. संबंधितांना त्या मुलीला परीक्षा देताना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये, यासाठी सूचना केल्या. त्या मुलीचे शिक्षणाधिकारी यांनी सांत्वन करीत आम्ही तुझ्यासोबत आहोत, अशा शब्दात तिला धीर दिला.